दै. गोदातीर दिनांक : 07/04/2022

दै. गोदातीर दि. 07/03/2022

# मुक्रमाबाद पोलिसांची अवैध गुटखा वाहतुकीवर मोठी कारवाई



**मुक्रमाबाद-** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक संग्राम जाधव यांनी पदभार स्वीकारल्यापासून आजपर्यंत अवैध दारु व अवैध गुटखा संदर्भात विशेष लक्ष देवून अतिशय मोठ्या प्रमाणात धाडसी कारवाया केल्या आहेत. गेल्या आठवड्यात अवैध गुटखा वाहतूक करताना सावरमाळ येथे आरोपीस ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध विविध कलमांतर्गत कारवाई करण्यात आली. अशाच पद्धतीने गावठी व विदेशी, देशी दारुचा अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले. गुटखा बंदीही चोरट्या मार्गाने होत असल्यामुळे सावरमाळ येथे सलग एक महिन्यापासून नाकाबंदी करण्यात आली आहे. ये-जा करणाऱ्या प्रत्येक वाहनाची चौकशी करुन अवैध गुटखा वाहतुकीवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. नाकाबंदी दरम्यान अवैध गुटखा वाहतूक करताना दादाराव व्यंकटराव बोडके रा. तुपदाळ ता. मुखेड हा मिळून आला असून, भादवी ३२८ नुसार गुटखा प्रतिबंधक २००६ नुसार कलम २३,२७,५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे.